मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » शनिवार, दिनांक १३ जानेवारी २०२४ । पान १

# पवनाथडी जत्रेला नागरिकांचा प्रतिसाद

## ११ ते १५ जानेवारी या कालावधीत पवनाथडी जत्रेचे आयोजन

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पवनाथडी जत्रेत ८२२ स्टॉल्स असून त्यातील ३४२ स्टॉल्स हे साहित्य विक्रीसाठी, २२० स्टॉल्स शाकाहारी मराठमोळ्या खाद्यपदार्थांसाठी, २५० स्टॉल्स हे मांसाहारी खाद्यपदार्थांसाठी आणि बाकीचे १० स्टॉल्स हे महापालिकेतर्फे नागरिकांना विविध सुविधा पुरविण्यासाठी राखीव ठेवण्यात आले आहेत. साहित्य खरेदी, खाद्यपदार्थांचा अस्वाद घेण्यासाठी गर्दी करताना दिसतात. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तुंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी सांगवी येथील पी. डब्ल्यू. डी मैदान येथे ११ ते १५ जानेवारी २०२४ या कालावधीत पवनाथडी जत्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या जत्रेचे उद्घाटन खासदार श्रीरंग आप्पा बारणे, आमदार अश्विनी जगताप आणि अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांच्या हस्ते तसेच महिला मोर्चा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ यांच्या उपस्थितीत संपन्न आले, त्यावेळी अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील बोलत होते. या उद्घाटन समारंभास माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, माजी नगरसदस्य शंकर जगताप, राजेंद्र राजापुरे,विलास मडीगेरी, राजू दुर्गे, सागर अंगोळकर, माजी नगरसदस्या उषा मुंढे, शारदा सोनवणे, मनिषा पवार, उप आयुक्त मनोज लोणकर, अजय चारठाणकर, क्षेत्रीय अधिकारी उमेश ढाकणे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, आपत्ती व्यवस्थापन प्रमुख ओमप्रकाश बहिवाल यांसह महापालिका कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने



उपस्थित होते. पवनाथडी जत्रेशी शहरातील अनेक महिलांच्या भावना जोडलेल्या आहेत. त्यांच्यासाठी ही जत्रा स्वत:चे कलागुण, अस्तित्व आणि क्षमता सिद्ध करण्याची एक नामी संधी असते. महापालिकेने बचत गटातील महिलांची हीच भावना आणि गरज ओळखून पवनाथडी जत्रा सुरू केली. यामध्ये लोकप्रतिनिधींचे सहकार्य आणि नागरिकांचा उत्फुर्त प्रतिसाद महत्वाचा दुवा ठरला. आज पवनाथडी जत्रा पिंपरी चिंचवड शहराची एक परंपरा बनली आहे आणि ही परंपरा अशीच वर्षानुवर्षे चालू राहील, असा विश्वास अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी व्यक्त केला. अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील म्हणाले, महापालिकेने नेहमीच महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबविले आहेत. महिलांना कायमस्वरूपी आर्थिक पाठबळ मिळावे यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे. महापालिका महिला बचत गटांना आणखी सक्षम करण्यासाठी महिला बचत गट मॉल ही संकल्पना राबविण्याचा विचार सुरू आहे. यासाठी त्यांना एकाच ठिकाणी गाळे उपलब्ध करून देण्यात येणार असून या संकल्पनेमुळे बचत गटांना कायमस्वरूपी एक व्यासपीठ निर्माण होणार आहे. आमदार अश्विनी जगताप म्हणाल्या, स्थानिक नागरिकांसाठी एक गावजत्रा असावी अशी शहरातील बऱ्याच महिलांची इच्छा होती. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने महिलांची हीच गरज ओळखून पवनाथडी जत्रा स्त्रियांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी, रोजगार आणि व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी सुरू केली. आज ही पवनाथडी जत्रा शहराची मानबिंदू ठरली आहे. पवनाथडी जत्रेच्या माध्यमातून शहरातील नागरिकांना विविध खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्याची तसेच देशी बनावटीच्या आकर्षक आणि टिकाऊ वस्तू विकत घेण्याची संधी मिळत आहे. नवीन वर्षास सुरुवात होताच पवनाथडी जत्रा कधी जाहीर होते आणि आपण भाग घेतोय असे वेध बचत गटांना लागतात. यावर्षीही जत्रा जाहीर झाली आणि महापालिकेने उत्तम नियोजनासह महिलांना जास्तीत जास्त सुविधा पुरविण्यावर भर दिला असल्याचे दिसत असून स्थानिकांना जास्तीत जास्त संधी देण्यावर भर दिला आहे. बचत गटांच्या माध्यमातून घरखर्च काढण्याचा मानस या पवनाथडी जत्रेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक महिलेचा असतो आणि या महिलांना रोजगार, उत्तम व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी विविध योजनांच्या आधारे वेळोवेळी सहकार्य करण्याचे काम शहरातील लोकप्रतिनिधींनी आणि महापालिकेने केले आहे.

# को'वॉर' पुस्तकाचे अजित पवार यांच्या हस्ते प्रकाशन

## आत्मविश्वास देणारे, लढण्यासाठी बळ देणारे पुस्तक : अजित पवार

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

संग्राह्य मूल्य असणारे 'को'वॉर' हे पुस्तक कोणत्याही संकटावर मात करण्यासाठी आत्मविश्वास देणारे, लढण्यासाठी बळ देणारे पुस्तक म्हणून उपयुक्त ठरेल, असा विश्वास राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला. पिंपरी-चिंचवड महापालिकेचे सहाय्यक आयुक्त अण्णा बोदडे आणि ज्येष्ठ पत्रकार राजन वडके यांच्या 'को'वॉर लढा जीवन मरणाचा या पुस्तकाचे प्रकाशन गुरुवारी (दि.११) श्री. पवार यांच्या हस्ते पुणे विधान भवनात करण्यात आले. त्यावेळी त्यांनी या पुस्तकासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. यावेळी ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ, लेखक अण्णा बोदडे, राजन वडके, माजी नगरसेवक अजित गव्हाणे, राहुल भोसले, शाम लांडे, शासकीय अधिकारी, कर्मचारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. पपरी-चिंचवड शहरातील कोरोना संकटाचा सामना करताना सामूहिक जबाबादारीने केलेल्या



कार्याची माहिती 'को'वॉर' पुस्तकाच्या माध्यमातून शब्दबद्ध करण्याचा बोदडे आणि वडके यांचा हा उपक्रम कौतुकास्पद आहे. कोरोना संकटकाळातील पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांवर ओढवलेल्या परिस्थितीचा आणि त्या काळात महापालिका, वैद्यकीय, पोलिस आदी प्रशासकीय यंत्रणा आणि राजकीय व सामाजिक संघटनांनी केलेल्या कार्याचा आढावा घेणारे हे पुस्तक आहे. कोरोना बाधितांचे जीव वाचविण्यासाठी अक्षरशः प्राणांची बाजी लावत उपचार करणारे डॉक्टर, सिस्टर, नर्स, वॉर्डबॉय, मावशा या 'कोरोना वॉरियर्स'नी केलेल्या सेवेचं अभूतपूर्व दर्शन घडले. सामाजिक, आर्थिक, औद्योगिक, कामगार, भाजी-फळ बाजार, किराणा व्यवसाय, शैक्षणिक, चित्रपट, नाट्य, सांस्कृतिक, क्रीडा, प्रसिद्धी माध्यम आदी सर्वच क्षेत्रांना या भयावह महामारीचा फटका बसला. एकीकडे कोरोनाची लागण झाल्यानं कुटुंबच्या कुटुंब जग सोडून जात होती. पिंपरी-चिंचवड मधील ही परिस्थिती आम्ही अनुभवत होतो. 'रोना काळातील सामाजिक वास्तव नजरेत, मनांत साठवत होतो. कोरोनाच्या संकटावर मात करत जगण्यासाठी लोकांच्या जीवन-मरणाच्या या लढ्याची कायमस्वरुपी नोंद झाली पाहिजे, या विचारातून को-वॉर लढा जीवन मरणाचा या पुस्तकाचा जन्म झाला, असे मनोगत बोदडे आणि वडके यांनी व्यक्त केले आहे.

# देशाला हुकुमशाही पासून रोखण्यासाठी संविधानाची अंमलबजावणी होणे आवश्यक

## कसबा मतदार संघाचे आमदार रवींद्र धंगेकर यांचे प्रतिपादन

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
जातीयवादी आणि धार्मिक तेढ वाढवण्याचा प्रयत्न करणाऱ्या शक्तीला रोखण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांनी काँग्रेसची साथ देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळेच विचारवंतांचा पक्ष म्हणून ओळख असलेल्या ‘आप’ मधून सुजाण युवक काँग्रेस पक्षात प्रवेश करतो आहे. देशाला हुकुमशाही पासून रोखण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व जाती धर्माच्या मावळ्यांना बरोबर घेऊन स्वराज्य स्थापन केले. त्याप्रमाणे समोरच्या व्यक्तीच्या धर्माचा मान, सन्मान राखणे हा आमचा धर्म आहे. हिंदू, मुस्लिम या देशात एकजुटीने राहत आहेत. आजचा युवक राहुल गांधींच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून काँग्रेसमध्ये येत आहे. ‘आप’ मधून काँग्रेस पक्षात प्रवेश केलेल्यांचे मी स्वागत करतो असे प्रतिपादन कसबा मतदार संघाचे आमदार रवींद्र धंगेकर यांनी केले.




बुधवारी पिंपरी येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात आम आदमी (‘आप’) पक्षाचे माजी शहर अध्यक्ष अनुप शर्मा, उपाध्यक्ष महेश बिराजदार पाटील, सामाजिक न्याय विभाग पुणे जिल्हा माजी अध्यक्ष वहाब शेख तसेच विष्णु पाटील, दिपक श्रीवास्तव, सतिश नायर, सिमा यादव, मेमुना शेख, सद्दाम पठाण, रवी कृष्ण मोरे, जावेद शेख, भैय्यासाहेब कांबळे, गणेश कांबळे, मुकेश जाधव, अजय गायकवाड, फिलिप मकासरे, रामसिंग यादव आदींचा शेकडो कार्यकर्त्यांनी डॉ. कैलास कदम यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करीत काँग्रेस पक्ष प्रवेश केला. त्यांचे स्वागत आ. धंगेकर आणि पिंपरी चिंचवड काँग्रेसचे शहर अध्यक्ष डॉ. कैलास कदम यांनी केले. यावेळी महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेसच्या माजी अध्यक्ष शामला सोनवणे, युवक शहराध्यक्ष कौस्तुभ नवले, महिला शहराध्यक्ष सायली नढे, ब्लॉक अध्यक्ष विश्वनाथ जगता,प माऊली मलशेट्टी, विठ्ठल शिंदे, उपाध्यक्ष नरेंद्र बनसोडे, भरत वाल्हेकर, बाबा बनसोडे आदी उपस्थित होते. यावेळी काँगेस शहर अध्यक्ष डॉ. कैलास कदम म्हणाले की, काँग्रेसमध्ये कार्यकर्त्यांचा सन्मान केला जातो. याचे उदाहरण कार्यसम्राट आमदार रवींद्र धंगेकर आहेत. गेली ६५ वर्षे सर्वसामान्यांना बरोबर घेऊन देशाचा विकास करीत, न्याय देण्याचे काम काँग्रेसने केले आहे. परंतु देशाच्या विकासाचा कोणताही अजेंडा भाजपा पुढे नाही. आता पुन्हा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत काँग्रेसचा महापौर करायचा आहे, त्यासाठी सर्वांना सोबत घेऊन काँग्रेसची संघटना बांधण्याचे काम करीत आहे. सूत्रसंचालन विश्वनाथ जगताप यांनी केले.

# राज्याचे उपमुख्यमंत्री व वनमंत्री यांच्या हस्ते माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

## चिंचवड मतदारसंघात दिनदर्शिका पोहचवण्याचा शत्रुघ्न काटे यांचा निर्धार

**पुणे।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि वने, सांस्कृतिक कार्य आणि मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी आपल्या या दिनदर्शिकेच्या माध्यमातून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून साकारत असलेल्या विकसित भारताची




महत्वपूर्ण घडामोडी मतदार संघातील जनमानसात पोहचवण्याचा एक छोटासा प्रयत्न केला आहे. नरेंद्र मोदी याच्या अभिनव कल्पनेतून सर्वंकष व सर्वसमावेशक आणि उपक्रमांच्या धोरणाशी संबंधित निर्णयांमुळे जागतिक व्यासपीठावर जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारताची खरी क्षमता आणि भूमिका समोर आली आहे. जागतिक पातळीवर आपल्या धोरणांच्या माध्यमातून ठसा उमटवणाऱ्या देशातील महत्वपूर्ण घडामोडी या दिनदर्शिकेत नमूद करण्यात आले आहे जसे की अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिर निर्माण यशस्वीपणे पार पडलेली चंद्रयान-३ मोहीम, जलद रस्ते बांधकाम रेकॉर्ड, अटल बोगदा, प्रोजेक्ट टायगर,ऋझअख समिट, जी-२० परिषद आयोजन, उत्तराखंड ग्लोबल इन्व्हेस्टर समिट, शिवरायांच्या पुतळ्याचे अनावरण, नवीन संसद भवन, ३.७ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था आणि वंदे भारत ट्रेन इ. अश्या विविध उपक्रमद्वारे आपल्या विकासाच्या दृष्टीने देशाला नव्या उंचीवर पोहचवणारे आपले प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि त्यांचे काम घराघरात पोहचवण्यासाठी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी संपूर्ण चिंचवड मतदारसंघात हे दिनदर्शिका पोहचवण्याचा निर्धार केला आहे. यावेळी बांधकाम व्यावसायिक राजुशेठ सांकला, कृष्णकुमार गोयल आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

# शिवराजसिंह चौहान पुण्यात गरजले

## आजही मध्य प्रदेशातील जनता मला मामाच म्हणते

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** आज मी माजी मुख्यमंत्री असलो, तरी नाकारलेला नाही. आजही मध्य प्रदेशातील जनता मला मामाच म्हणते. राजकारण केवळ पदासाठी नसते. मी राजकारणातून बाहेर पडलेलो नाही. अजून बरीच कामे बाकी आहेत, अशी ठाम भूमिका शिवराजसिंह चौहान यांनी मांडली. एमआयटी विश्वशांती विद्यापीठात आयोजित भारतीय छात्र संसद समारोप कार्यक्रमात चौहान बोलत होते. एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. विश्वनाथ कराड, कार्याध्यक्ष प्रा. राहुल कराड या वेळी उपस्थित होते. दहावीत असताना केलेल्या पहिल्या आंदोलनापासूनच्या आठवणी सांगून शिवराजसिंह चौहान म्हणाले, की मध्य प्रदेशात १००० मुलांमागे ९१२ मुली इतके कमी प्रमाण होते. मुलगी म्हणजे




कुटुंबावरील भार असे मानले जायचे. हे चित्र बदलण्यासाठी आम्ही मुलींचे विवाह करायला सुरुवात केली. मुख्यमंत्री झाल्यावर पहिली योजना लाडली लक्ष्मी योजना सुरू केली. मुलगी कुटुंबाला पैसे मिळवून देणारी ठरली. त्यामुळे मध्य प्रदेशात मुलींची संख्या वाढली. आज एक हजार मुलांमागे ९७६ मुली आहेत. मुलींनीच मला मामा म्हणायला सुरुवात केली. मला माझे आयुष्य सफल झाल्यासारखे वाटते. महिलांसाठी ५० टक्के आरक्षण दिले. १३ टक्के पदे महिलांसाठी पोलिसांमध्ये राखीव ठेवण्यात आली आहेत. लाडली बेहना योजनेची देशात चर्चा आहे. ही योजना म्हणजे रेवडी नाही. जनतेसाठी कल्याणकारी योजना आहे. अलीकडेच झालेल्या निवडणुकीवेळी राजकीय विश्लेषक म्हणत होते, भाजप निवडून येणार नाही. पण मी जिंकायंचच ठरवलं होतं. मात्र या निवडणुकीत भाजपने स्पष्ट बहुमत मिळवला, तसंच आतापर्यंतची सर्वांत जास्त मतेही भाजपला मिळाली. २२ जानेवारीला श्रीराम मंदिराचे उद्घाटन होणार आहे. त्यामुळे इतक्या वर्षांच्या संघर्षानंतर आता रामलल्ला येतील आणि रामराज्यही येणार आहे, असेही शिवराजसिंह चौहान म्हणाले. स्वतंत्रपणे काम करायला मर्यादा आहेत. राजकारणात आल्याने मोठ्या स्तरावर काम करणे शक्य झाले. राजकारणात यायला घाबरू नका. राजकारण काय केवळ चोरी करणाऱ्यांचे आहे का, असा सवाल मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी उपस्थित केला. एमआयटी विश्वशांती विद्यापीठात आयोजित भारतीय छात्र संसद समारोप कार्यक्रमात चौहान बोलत होते. एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. विश्वनाथ कराड, कार्याध्यक्ष प्रा. राहुल कराड यावेळी उपस्थित होते. तरुणांशी संवाद साधताना चौहान म्हणाले, की माझ्या मतदारसंघातून आतापर्यंत मी अकरा वेळा निवडून आलोय. मी माझ्या मतदारसंघात प्रचार करत नाही. राजकारणातील पैशाचा प्रभाव संपवण्यासाठी राजकारणात या. स्वतः ला ओळखा. तुम्ही तुम्हाला हवे ते मिळवू शकता. स्वतंत्रपणे काम करायला मर्यादा आहेत. राजकारणात आल्याने मोठ्या स्तरावर काम करणे शक्य झाले. राजकारणात यायला घाबरू नका. राजकारण काय केवळ चोरी करणाऱ्यांचे आहे का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान मामा या नावानेही ओळखले जातात. पुण्यात भारतीय छात्र संसदेच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांशी संवाद साधताना शिवराजसिंह चौहान यांनी मामा होण्याची गोष्ट सांगितली.

### ‘सीबीजी’ निर्मिती करा

**» शिवराजसिंह चौहान म्हणाले, की मध्य प्रदेशात एक हजार मुलांमागे मुलांमागे ९१२ मुली इतके कमी प्रमाण होते. मुलगी म्हणजे कुटुंबावरील भार असे मानले जायचे. ही परिस्थिती बदलणे आवश्यक होते. त्यामुळे आम्ही मुलींचे विवाह करून देण्यास सुरुवात केली. तसेच मुख्यमंत्री झाल्यावर पहिली योजना आणली लाडली लक्ष्मी या योजनेतून मुलींना वेगवेगळ्या टप्प्यावर पैसे देण्यात येऊ लागले. त्यामुळे मुलगीच कुटुंबाला पैसे मिळवून देणारी ठरली. गेल्या काही वर्षांत मध्य प्रदेशातील मुलींचे प्रमाण वाढले आहे. आज एक हजार मुलांमागे ९७६ मुली आहेत. मुलींसाठी उपयुक्त योजना सुरू केल्यामुळे मुलींनीच मला मामा म्हणायला सुरुवात केली. आईचा भाऊ म्हणजे मामा, मुलांवर आईसारखं प्रेम करतो तो मामा असतो. त्यामुळे मला माझे आयुष्य सफल झाल्यासारखे वाटते. लाडली बेहना योजनेची देशात चर्चा आहे. ही योजना म्हणजे रेवडी नाही.**

# इथेनॉलवर घातलेल्या निर्बंधांमुळे कारखाने अडचणीत

## इथेनॉलवरील निर्बंध तात्पुरते : नितीन गडकरी यांची माहिती

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** केंद्र सरकारने इथेनॉल निर्मितीवर घातलेल्या निर्बंधांमुळे साखर कारखाने अडचणीत आले आहेत, याची जाणीव केंद्र सरकारला आहे. देशाच्या साखर उत्पादनात काहीशी तुट येण्याची शक्यता असल्यामुळे हे निर्बंध घालण्यात आले आहेत. पण, हे निर्बंध तात्पुरते आहेत. लवकरच निर्बंधांमधून दिलासा देण्यात येईल, असे स्पष्ट संकेत केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी दिले. वसंतदादा शुगर इंस्टिट्यूटने (व्हीएसआय) आयोजित केलेल्या जागतिक साखर उद्योगातील शाश्वतता, आव्हाने आणि संधी, या विषयावर आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये ते बोलत होते. गडकरी यांच्या हस्ते तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाचे उद्घघाटनही करण्यात आले.नितीन गडकरी म्हणाले, केंद्र सरकारने इथेनॉल निर्मितीवर घातलेल्या निर्बंधांमुळे साखर कारखाने अडचणीत आले आहेत, याची जाणीव केंद्र सरकारला आहे. पण, हे निर्बंध तात्पुरते आहेत. इथेनॉल प्रश्नी मी पंतप्रधान



नरेंद्र मोदी यांच्याशी संपर्कात आहे. दीर्घकालीन इथेनॉल धोरणानुसार केंद्र सरकारकडून इथेनॉल उत्पादनाला प्रोत्साहन देण्याची भूमिका कायम आहे. लवकरच इथेनॉल निर्बंधांबाबत दिलासा मिळेल. आता साखर कारखान्यांनी फक्त इथेनॉल उत्पादनावर थांबू नये. कॉम्प्रेस्ड बायोगॅस (सीबीजी), हरीत हायड्रोजन आणि हरीत विमान इंधन उत्पादनाच्या दिशेने गेले पाहिजे. पानिपतमध्ये भाताच्या पेंड्यापासून (भाताचे उर्वरीत कृषी अवशेष) कॉम्प्रेस्ड बायोगॅस आणि हरीत विमान इंधन उत्पादन करण्यात यश आले आहे. आता साखर कारखान्यांनी कारखान्यांनी कचरा, सांडपाणी, मळीसह सर्व प्रकारचा कृषी कचरा आणि शहरी कचऱ्यापासून इथेनॉलसह सीबीजी, हरित हायड्रोजन आणि विमान इंधन निर्मिती करण्याकडे वळावे. केंद्राच्या हरीत हायड्रोजन धोरणांअर्गत सहकार्याची भूमिका घेतली जाईल, असेही गडकरी म्हणाले. केंद्र सरकारने इथेनॉल उत्पादन धोरणानुसार देशात फक्त इथेनॉलचे ३०० पंप सुरू करण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे आता देशभरातील साखर कारखान्यांनी पेट्रोल-डिझेल पंपाच्या बरोबरीने इथेनॉल पंप सुरू करता येतील. आसाममध्ये बांबूपासून इथेनॉल निर्मितीचा प्रयोग यशस्वी झाला असून, उत्पादित झालेले इथेनॉल बांगलादेशाला निर्यात केले जात आहे. लवकरच देशातील रस्त्यांवरून पूर्णपणे इथेनॉल आणि हरित हायड्रोजनवर चालणाऱ्या गाड्या धावतील, असेही गडकरी म्हणाले. साखर उद्योगामुळे पश्चिम महाराष्ट्राचा विकास झाला आहे.

# राज्यातील सर्व शाळांमध्ये सत्यशोधक चित्रपट दाखवला पाहिजे : शरद पवार

## सत्यशोधक हा एक उत्तम चित्रपट

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जीवनावर आधारित 'सत्यशोधक' चित्रपटाचा विशेष प्रयोग राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्यासाठी पुण्यातील कोथरूड येथील सिटी प्राईड आयोजित करण्यात आला होता. तो चित्रपट पाहिल्यानंतर प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधी सोबत बोलताना शरद पवार म्हणाले की,सत्यशोधक हा एक उत्तम चित्रपट आहे. त्यामध्ये फुलेंच्या आयुष्यातील प्रसंग वास्तव रुपात मांडण्यात आलेले आहेत. कुठल्याही प्रकारची अतिशयोक्ती नाही. अतिशय प्रभावी पद्धतीने साकारण्यात आलेला आहे. पण सध्याची एकूणच सामाजिक स्थिती पाहिल्यावर आजच्या काळात आपण ५० ते ६० वर्ष मागे जातोय की, काय अशी सामाजिक स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत महात्मा फुलेनी मांडलेला सत्यशोधक विचार समाजापर्यंत पोहचणे गरजेचे आहे. त्या पार्श्वभूमीवर सत्यशोधक हा चित्रपट महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये दाखवण्यात आला पाहिजे. अशी विनंती मी राज्य सरकारला करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तसेच ते पुढे म्हणाले की, सत्यशोधक याचा अर्थ कुठल्या जाती धर्माचा विरोध नसून वास्तविकता आहे.हा विचार नव्या पिढीपर्यंत जाण आवश्यक असल्याच देखील त्यांनी यावेळी सांगितले. मुंबईला



रायगडशी जोडणाऱ्या शिवडी न्हावा शेवा अटल सेतू सागरी सेतूचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. पण त्या विभागाचे मंत्री नितीन गडकरी हे त्या कार्यक्रमाला हजर नव्हते आणि जाहिरातीमध्ये देखील त्यांचे नाव देखील नव्हते. त्यावरून राजकीय आरोप प्रत्यारोप पाहण्यास मिळत आहे.तर यापूर्वी हजारो कोटींचे घोटाळे होत होते.मात्र आता त्याच किंमतीची काम होत आहेत. अशी टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली आहे.त्या प्रश्नावर शरद पवार म्हणाले की,केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि माझा पुण्यातील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट येथील आजचा कार्यक्रम तीन महिन्यापूर्वी कार्यक्रम ठरला होता.त्यामुळे नितीन गडकरी हे माझ्यासोबत व्हिएसआय येथील कार्यक्रमाला आले होते. तसेच मी नरेंद्र मोदीच भाषण ऐकलं नसून ऐकल्यावर बोलेन अशी भूमिका यावेळी त्यांनी मांडली.महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जीवनावर आधारित 'सत्यशोधक' चित्रपटाचा विशेष प्रयोग राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वे सर्वा शरद पवार यांच्यासाठी पुण्यातील कोथरूड येथील सिटी प्राईड आयोजित करण्यात आला होता. तो चित्रपट पाहिल्यानंतर प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधी सोबत बोलताना शरद पवार म्हणाले की,सत्यशोधक हा एक उत्तम चित्रपट आहे. त्यामध्ये फुलेंच्या आयुष्यातील प्रसंग वास्तव रुपात मांडण्यात आलेले आहेत. कुठल्याही प्रकारची अतिशयोक्ती नाही. अतिशय प्रभावी पद्धतीने साकारण्यात आलेला आहे. पण सध्याची एकूणच सामाजिक स्थिती पाहिल्यावर आजच्या काळात आपण ५० ते ६० वर्ष मागे जातोय की, काय अशी सामाजिक स्थिती निर्माण झाली आहे.

# निवडणुकांच्या रणनीतीसाठी काँग्रेसची पुण्यात बैठक?

## २३ जानेवारीला प्रमुख नेत्यांची उपस्थिती

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसची मुंबईत शुक्रवारी बैठक झाली. या बैठकीनंतर पश्चिम महाराष्ट्रासाठी पुण्यात येत्या २३ जानेवारी रोजी बैठक होणार असून त्यामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील मतदारसंघांचा बूथनिहाय आढावा घेतला जाणार आहे. पुण्यातील इच्छुकांच्या नावांबाबतही या बैठकीत चर्चा होण्याची शक्यता आहे.राज्याचे प्रभारी रमेश चेन्नीथला आणि प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होईल. या बैठकीला काँग्रेसचे नेते, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे आणि पृथ्वीराज चव्हाण, आमदार सतेज पाटील, अनंत थोपटे, प्रणिती शिंदे उपस्थित राहणार आहेत. पुणे लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसकडून २० जणांचे अर्ज आले आहेत. त्यामध्ये विद्यमान आमदार रवींद्र धंगेकर यांच्यासह माजी मंत्री बाळासाहेब शिवरकर, माजी आमदार मोहन जोशी, अनंत गाडगीळ आणि दीप्ती चवधरी यांचा समावेश आहे. या आजी-माजी आमदारांबरोबरच प्रभारी शहराध्यक्ष अरविंद शिंदे, सरचिटणीस ॲड.



अभय छाजेड, संजय बालगुडे आणि विरेंद्र किराड, राज्य प्रवक्ते गोपाळ तिवारी, माजी नगरसेवक दत्ता बहिरट, महिला प्रदेश उपाध्यक्षा संगीता तिवारी या अन्य पदाधिकाऱ्यांनीही पक्षाकडे नाव दिले आहे. त्यामुळे यापैकी कोणाला उमेदवारी मिळणार, याबाबत चर्चा सुरू झाली आहेत. पुण्यात येणाऱ्या बैठकीत या नावांवर चर्चा होण्याची शक्यता आहे. पश्चिम महाराष्ट्रातील मतदारसंघांतील तयारी, बूथनिहाय आढावा या बैठकीत घेतला जाणार आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात आणि देशात काँग्रेसच्या बैठका सुरू झाल्या आहेत. त्यादृष्टीने पुण्यातील बैठकही महत्त्वपूर्ण ठरणार आहे. बैठकीत नावांवर चर्चा होणार असली तरी निवडून येण्याची क्षमता या निकषावर उमेदवारीची निवड होणार आहे. प्रदेश पातळीवरील वरिष्ठ नेत्यांकडून ती जाहीर करण्यात येईल. या बैठकीत केवळ नावांची चर्चा होणार असून उमेदवाराच्या नावाची घोषणा होणार नाही, असे काँग्रेसच्या पदा धिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसची मुंबईत शुक्रवारी बैठक झाली. या बैठकीनंतर पश्चिम महाराष्ट्रासाठी पुण्यात येत्या २३ जानेवारी रोजी बैठक होणार असून त्यामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील मतदारसंघांचा बूथनिहाय आढावा घेतला जाणार आहे. पुण्यातील इच्छुकांच्या नावांबाबतही या बैठकीत चर्चा होण्याची शक्यता आहे.राज्याचे प्रभारी रमेश चेन्नीथला आणि प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होईल. या बैठकीला काँग्रेसचे नेते, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे आणि पृथ्वीराज चव्हाण, आमदार सतेज पाटील, अनंत थोपटे, प्रणिती शिंदे उपस्थित राहणार आहेत.